महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३२० वा दिनांक : ०२/११/२०२५ वार : रविवार

## ५ नोव्हेंबर ते ३१ जानेवारीपर्यंत निवडणूका पूर्ण होणार - माजी गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील



**पुणे** : राज्यात मतचोरीविरोधात विरोधी पक्षांचा एल्गार सुरू असतानाच, महायुतीचे ज्येष्ठ नेते आणि माजी गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी थेट आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तारखा सांगितल्या आहेत. ५ नोव्हेंबर ते ३१ जानेवारी दरम्यान सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण होण्याचा अंदाज दिलीप वळसे-पाटील यांनी व्यक्त केला आहे.

राज्यात सध्या मतदार याद्यांमधील गंभीर घोळ, मतचोरी आणि दुबार नावांवरून विरोधक आक्रमक झाले आहेत. आज मुंबईत महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या संयुक्ताने निवडणूक आयोगाविरोधात सत्याचा मोर्चा काढण्यात आला. मतदार नोंदणी प्रक्रियेत झालेल्या कथित अनियमिततेविरोधात आणि पारदर्शक निवडणुकीच्या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. आता महायुतीचे नेते दिलीप वळसे-पाटील यांनी निवडणूक आयोगाच्या घोषणेपूर्वीच केलेल्या उपरोक्त विधानाने राजकीय वर्तुळात खळबळ माजली.

मंचर येथे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा युवक-युवती मेळावा पार पडला. या मेळाव्यात दिलीप वळसे-पाटील पाटील यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी मागील अनेक वर्षांपासून रखडलेल्या नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या तारखांची माहिती दिली.

दिलीप वळसे-पाटील म्हणाले, मी तारीख जाहीर करत नाही, तो अधिकार निवडणूक आयोगाचा आहे. मात्र, आमच्याकडील माहितीनुसार ५ नोव्हेंबरला नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुका जाहीर होणार आहेत. तर १५ डिसेंबरला जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी मतदान होईल.

जिल्हा परिषदेच्या निवडणुका सुरू असतानाच महानगरपालिका निवडणुका जाहीर होऊन १५ जानेवारीला मतदान पार पडेल, आणि ३१ जानेवारीपर्यंत सर्व निवडणुका पूर्ण होतील, असा विश्वास वळसे पाटलांनी व्यक्त केला. त्यामुळे वळसे पाटलांनी जाहीर केलेल्या या संभाव्य वेळापत्रकामुळे राज्यातील राजकारण आणखी तापणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

अनेक वर्षांपासून निवडणुका रखडल्याने राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकीय राजवट सुरू आहे. एका बाजूला सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत, तर दुसरीकडे विरोधी पक्ष रोज निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करत आहेत. अशा राजकीय वातावरणात, निवडणूक आयोगाच्या औपचारिक घोषणेपूर्वीच एका सत्ताधारी नेत्याने संपूर्ण राज्याच्या महत्त्वाच्या निवडणुकांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

## संभाजीनगर ९६३३ कोटींचा आराखडा शासनास पाठवणार - पालकमंत्री संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर** : कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर, वेरूळ,पैठण आणि आपेगाव या क्षेत्रांचा ९६३३ कोटी ५१ लाख रुपयांचाविकास आराखडा तयार कलाआहे. या आराखड्यामुळेजिल्ह्यात शाश्वत सुविधा निर्माण होतील, पर्यटनही वाढेल,जिल्ह्याचा लौकिक देशभरातवाढेल, अशा पद्धतीने विकास आराखड्याची अंमलबजावणी करावी, असे निर्देश पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिले.

या आराखड्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयातशुक्रवार, ३१ ऑक्टोबर रोजीबैठक झाली. पालकमंत्री शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला इतर मागासवर्गीय मंत्री अतुल सावे, खासदार डॉ. भागवतकराड, खासदार डॉ. कल्याणकाळे, आमदार विक्रम काळे,प्रशांत बंब, रमेश बोरनारे, विलासभुमरे, जिल्हाधिकारी दिलीपस्वामी, पोलिस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड, मुख्यकार्यकारी अधिकारी अंकित,नियोजन अधिकारी भारत वायाळ,मुख्य अभियंता अतुल चव्हाण वविविध विभागांचे अधिकारीउपस्थित होते. २०२७ मध्ये नाशिकयेथे सिंहस्थ कुंभमेळा होणारआहे. त्यानिमित्त लाखो भाविकमहाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रांना भेटदेतील. वेरूळ आणि पैठण हीठिकाणे महत्त्वाची असल्यानेअंदाजे एक कोटी भाविक येतील,असा अंदाज घेऊन आराखडातयार केला आहे. हा आराखडालवकरच शासनाकडे सादर केलाजाणार असल्याची माहिती सादरीकरणादरम्यान देण्यात आलीआहे.

लोकप्रतिनिधींनी मांडल्या सूचना

आ. प्रशांत बंब यांनी आराखडा सर्व समावेशक असावा असेसांगितले. आ. रमेश बोरनारे यांनीवैजापूर तालुक्यातील रस्त्यांचासमावेश करावा अशी सूचनाकेली. आ. विक्रम काळे यांनीपार्किंगपासून देवस्थानापर्यंतबससेवा असावी, असे सांगितले.खा. डॉ. काळे यांनी स्थानिकउत्पादन व रोजगाराचा समावेशकरावा असे सांगितले. खा. डॉ.कराड यांनी भद्रा मारुती क्षेत्राचाहीसमावेश करावा अशी सूचनाकेली. मंत्री अतुल सावे यांनीवीज वितरण, ट्रान्सफॉर्मर, विद्युतखांबांचे स्थानांतरण यांचासमावेश करावा असे सुचवले.

## बोगस मतदान झाले तर निवडणूक कर्मचाऱ्यांचे हात-पाय तोडणार : ठाकरे गटाच्या उपनेत्याचा इशारा

**मुंबई** : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांत बोगस मतदान किंवा मतपेटीचा घोळ झाला तर संबंधित बूथवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे हात-पाय तोडण्यात येतील, असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते शरद कोळी यांनी दिला आहे. या प्रकरणी त्यांनी निवडणूक आयोगाला राज व उद्धव ठाकरे यांच्या मागण्या मान्य करण्याचाही सल्ला दिला आहे.

राज्यात सध्या मतदार याद्यांमधील कथित घोळावरून रणकंदन माजले आहे. महाविकास आघाडी व मनसेने आज या प्रकरणी मुंबईत सत्याच्या मोर्चाचे आयोजन केले आहे. या मोर्चाद्वारे आयोगाकडे मतदार याद्या स्वच्छ करण्याची मागणी करणयात आली आहे. या पार्श्वभूमीवर शरद कोळी यांनी निडवणूक आयोगासह प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत भाग घेणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना उपरोक्त इशारा दिला आहे.

शरद कोळी म्हणाले, निवडणूक अधिकाऱ्यांना विनंतीपूर्वक इशारा देतो की, उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्या मागण्या मान्य करा. तुमच्या निवडणुकीतील होणारा घोळ तात्काळ बंद करा. मी आपल्या माध्यमातून समस्त निवडणूक अधिकारी व कर्मचाऱ्यांना इशारा देतो. ज्या बुथवर बोगस मतदान होईल, ज्या बुथवर मतदानाच्या पेट्यांचा घोळा होईल, त्या ठिकाणी जे अधिकारी बसले असतील त्या अधिकाऱ्यांचे हात व पाय तोडल्याशिवाय शिवसेना व मनसैनिक राहणार नाहीत.

खरेतर निवडणूक अधिकाऱ्यांनी घरून निघताना आई, बाप व बायकोला सांगून यावे की, मी घरी सुखरूप आलो तर तुमचा नाही तर शिवसैनिक व मनसैनिकांचा. आता लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी आम्हाला ही पाऊले उचलावी लागतील. आम्ही याला गुन्हा म्हणणार नाही. तरी ही या सरकारने आमच्यावर गुन्हे दाखल केले, तरी आम्ही मागे हटणार नाही. पण ज्या - ज्या बुथवर बोगस मतदान होईल. मशिन घोटाळे होतील, त्या बुथवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे हात व पाय तोडल्याशिवाय आम्ही राहणार नाही, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे शरद कोळी यांनी दोन दिवसांपूर्वीच आगामी निवडणुकांत सोलापुरात काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांच्याशी जुळवून घेण्यास नकार दिला होता. प्रणिती शिंदे यांनी विधानसभा निवडणुकीत गद्दारी केली. त्यामुळे आमची युती तुटली तरी चालेल, पण आम्हाला त्यांचे नेतृत्व मान्य नाही. आम्ही त्यांच्याशी आघाडी करणार नाही. प्रणिती शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या आदेशाचे अवमान केला. महाविकास आघाडीचा धर्म पाळण्यात अपयशी ठरल्या. त्यांनी विरोधकांशी हातमिळवणी करून आघाडीला मातीत व गाळात नेऊन ठेवले. त्यामुळे त्या आमच्यासाठी चिल्लर आहेत, असे ते म्हणाले होते.

दुसरीकडे, सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री हसन मुश्रीफ यांनीही मतदारयाद्यांवरील महाविकास आघाडीच्या भूमिकेला पुरक भूमिका घेतली आहे. सदोष मतदार याद्यांवर निवडणुका नकोत. सदोष मतदार याद्यांवर निवडणुका घेण्यास आपल्या पक्षाचा व युतीचाही आक्षेप आहे. देशाची लोकसंख्या व छपाईतील चुकांमुळे मतदार याद्यांत त्रुटी राहतात. या चुका दुरुस्त करण्यास सरकारची हरकत नाही, असे ते म्हणालेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ नोव्हेंबर २०२५


## डीजेसह सवाद्य मिरवणूक काढून नागापूरच्या ग्रामस्थांनी केला शिक्षकांचा सन्मान




**गंगापूर :** नागापूर हे गंगापूर तालुक्यातील जेमतेम 400 लोकवस्तीचं गाव. 45 वर्ष जुनी प्राथमिक शाळा. शिक्षणाची अवस्था इतर खेड्यातल्या सरकारी शाळांसारखीच....पण चार वर्षांपूर्वी नितीन तागडे नावाचा एक शिक्षक बदलून येतात, आणि गावातील सरकारी शिक्षण व्यवस्थेचे चित्र 360° कोणातून बदलते.तशातच अशा शिक्षकाची बदली झाल्यानंतरचा निरोप समारंभ ग्रामस्थांनी ज्या आत्मीयतेने साजरा केला, ते पाहता हा समारंभ शिक्षकी पेशाची उंची वाढविणारा ठरला. नागापूर येथे एक ते चार वर्गाच्या 32 विद्यार्थ्यांना शिकवणारे नितीन तागडे यांच्या बदलीनंतरच्या निरोपासाठी ग्रामस्थांनी दीड किलोमीटर लांबीची सवाद्य डीजे लावून मिरवणूक काढली. निरोपाच्या दिवशी गावातील एकही नागरिक शेतावर कामाला गेला नाही. अबाल वृद्ध निरोपाला हजर राहिले. रस्त्याच्या दुतर्फा असलेली ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी आयाबाया बापड्यांची रांग पाहून हे एखाद्या मंत्र्यांच्या स्वागताला उभे राहून प्रतीक्षा करताय की काय असा भास व्हावा असे वातावरण होते.लग्नानंतर पाठवणी करताना घरातील लाडक्या लेकीला पाठवावं तसे गावातले पालक भावुक होत हमसून गळ्यात पडून रडत होते. हे चित्र काल्पनिक कथा कादंबरीतले नाही तर घडले गंगापूर तालुक्यातल्या नागापूर शाळेत.त्याचे असे घडले की, नितीन तागडे यांनी समर्पित भूमिकेने या गावाला एक शिक्षक किती बदल घडवू शकतो हे आपल्या असाधारण कामाने दाखवून दिले होते. त्यांनी शिक्षणातील प्रत्येक कृतीला सुंदरतेने मनोभावे नटवले. परिपाठात संगीत,अभंग यांचा अर्थपूर्ण समावेश करत त्यांनी परिपाठाचा पुस्तकाबाहेरच्या शिक्षणाचा समृद्ध सौदंर्योत्सव केला.खेळातील नैपुण्यासोबत कमरेभोवतो रिंग फिरवायचा खेळ विद्यार्थ्यांसाठी प्रेरनेचे नवे प्रवेशद्वार उघडविणारा ठरला. विद्यार्थ्यांची गुणवत्ता सर्वोत्तम करण्यासाठी शिक्षक करत असलेली धडपड ग्रामस्थांनी सातत्याने अनुभवली. श्री नितीन तागडे हे असे चौकटीबाहेरील उपक्रम योजत असतांना प्रसिद्धी किंवा सरकारी लौकिकापासून कोसो दूर राहिले. स्वतःच्या उपक्रमांच्या प्रेमात आकंठ बुडणारे गुरुजी आणि गुरुजींचे अधिकारी सभोवती सर्रास दिसत असतांना नितिन तागडे या प्रभ्रूतीचे वेगळेपण ग्रामस्थ आदराने अनूभवत होते.नागापूर शाळेतील विद्यार्थी महाराष्ट्रातील सर्व मुख्यमंत्र्याची नावे, भारतातील आतापर्यंत झालेले पंतप्रधानांची नावे क्रमाने सांगतात. तसेच भारतातील राष्ट्रपतींची नावे क्रमाने सांगतात. महाराष्ट्रातील भारतरत्न यांची नावे क्रमाने सांगतात.उलट्या क्रमानेही सांगतात. अधून मधूनही सांगतात. चौथी पर्यंतचे हे विद्यार्थी निव्वळ पढत पाठांतर न करता या संविधानिक पदांचे अर्थनिर्वचन करतात. मंत्री काय काम करतात हे सांगताना ते त्यांची नावासह खाती देखील सांगतात.महाराष्ट्रातील किल्ल्यांची नावे, भारतातील नद्यांची नावे, वर्तमानपत्रांची नावे, महाराष्ट्रातील 36 जिल्हे, 29 राज्य, फळांची नावे, प्राण्यांची नावे, भाजीपाल्यांची नावे, 100 पासून एक पर्यंत गिनती करत सरळ उलट्या क्रमाने सांगतात, उलटी एबीसीडी सांगतात, 30 पर्यंतचे वर्ग पाढेच काय तर 56 पर्यंतचे पाढे त्यांना पाठ आहेत.पाढे फक्त उभेच नाही तर आडवे देखील पाठ आहेत. सूर्यमालेतील ग्रहांची नावे, छत्रपती संभाजी नगरातील तालुक्यांची नावे अशा माहितीचा विद्यार्थी माहितीकोश झाले आहेत. ही किमया करणारे गुरुजी आता नागापूरच्या शाळेत नाहीत या भावनेने खंतावलेल्या ग्रामस्थांनी कृतज्ञतापूर्वक या शिक्षकाला नागापूर ग्रामरत्न हा पुरस्कार देऊन गौरविले एका शानदार समारंभात त्यांनी सत्काराचा सोहळा घडवून आणला.भावपुर्ण निरोप देत त्यांनी गुरुजीचे देवदूर्लभ वाटावे असे स्वागत केले. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर झालेल्या बदले आणि त्यानंतरच्या निरोप समारंभाच्या पार्श्वभूमीवर नागापूरच्या ग्रामस्थांनी केवळ कृतज्ञत्तेच्या भावनेपोटी योजनेला हा सोहळा शिक्षकी पेशाची उंची वाढविणारा ठरला अशी भूमिका सर्वत्र व्यक्त होत आहे.या आयोजनासाठी ताराचंद भाऊ दुबिले ,गणेशभाऊ सुकासे,गोकुळ सुकासे,नारायण सकाहारी सुकासे,सोपान चव्हाण,विनायक काका दुबिले,कल्याण उत्तमराव सुकासे,अरुण लोणकर,अशोक सुकासे यांनी पुढाकार घेतला.

## आदिवासी शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थी शालेय गणवेश व डी.बी.टी. पासून वंचित



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** महाराष्ट्रामध्ये आदिवासी शासकीय आश्रम शाळा ह्या 529 कार्यरत आहेत त्यापैकी छत्रपती संभाजीनगर आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत एकूण आठ शाळा कार्यरत आहेत तरी या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अन्नधान्य, मसाले, किराणामाल, दुध अंडी, केळी, फळे, शालेय गणवेश, सॅनेटरी नॅपकिन (मुलींसाठी) शालेय शैक्षणिक साहित्य (पाठयपुस्तके, व लेखन सामुग्री) कपडे शालेय साहित्य डि बी टी द्वारे विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होतात पण अजूनही डी बी टी दिली नाही आदिवासी विकास विभागामार्फत पुरविण्यात येते परंतु अद्याप प्रथम सत्र संपले तरीही छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थी शालेय गणवेश व डि बी टी पासून वंचित आहेत अशा पालकांनी भावना व्यक्त केल्या छत्रपती संभाजीनगर प्रकल्पातील शासकीय आश्रम शाळेत शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहेत आदिवासी विकास मंत्री एकीकडे सांगतात की विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ देणार नाही पण शाळांमध्ये शिक्षकच उपलब्ध नाही तर शैक्षणिक प्रगती विकास होणार कसा या विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट ही अत्यंत कमी दर्जाची उपलब्ध करून देतात गेल्या तीन महिन्यापासून बिऱ्हाड आंदोलन चालू आहे रोजंदारी कर्मचाऱ्यांचे आंदोलन काही दिवसातच मंत्रालयाला धडकणार आहे शासनाने रोजंदारी शिक्षकांना दहा वर्षे पूर्ण केलेल्या वर्ग ३ वर्ग ४ रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करून घ्यावे तसेच दहा वर्षे कमी सेवा देणा-या कर्मचाऱ्यांना रोजंदारी तत्त्वावर रुजू करण्याऐवजी खाजगी कंपनीमार्फत बाह्यस्त्रोताद्वारे १७९१ पदे भरण्याची योजना आखली आहे ते विरोधात नाशिक आदिवासी आयुक्त कार्यालयासमोर रोजंदारी शिक्षक व कर्मचारी आंदोलनावर ठाम आहेत तरी या आदिवासी शासकीय आश्रम शाळेतील वर्ग 3 वर्ग 4 कर्मचाऱ्यांचे बि-हाड आंदोलनाकडे आदिवासी विकास मंत्री कानाडोळा करत आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ नोव्हेंबर २०२५


## प्रा. डॉ. सतीश मस्के साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल माय महोत्सवात पुरस्काराने सन्मानित



**पिंपळनेर :** येथील कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रोफेसर डॉ.सतीश मस्के यांनी साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल मालतीबाई नामदेव पवार यांच्या पाचव्या स्मरणार्थ झिरणीपाडा ता.साक्री जि.धुळे येथे माय महोत्सवात गझलकार व कवी संमेलनाचे अध्यक्ष रावसाहेब कुवर (साक्री) सुप्रसिद्ध लोककवी प्रा. प्रशांत मोरे ( मुंबई ) प्रविण नामदेव पवार ( झिरणीपाडा ) यांच्या हस्ते व प्रा. डॉ. समाधान इंगळे ( छ. संभाजीनगर ) प्रसिद्ध कवी संजय आहेर ( नाशिक) यांच्या उपस्थितीत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आपल्या आईच्या स्मरणात गेल्या पाच वर्षापासून प्रविण नामदेव पवार हा साहित्य सोहळा महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिकांना, कवींना बोलावून एका आदिवासी पाड्यांमध्ये पार पाडला जातो. त्याचबरोबर या सोहळ्यात विविध क्षेत्रातील कर्तुत्ववान व्यक्तींचाही पुरस्कार देऊन सन्मान केला जातो.त्यामुळे अनेक नव साहित्यिकांनाही प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळुन गावातील तरुणांना उत्तम मार्गदर्शन मिळते आपले जीवन घडण्यास मदत होते.प्रा.डॉ.सतीश मस्के यांना या अगोदर शैक्षणिक , सामाजिक व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पाच वेळा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे खान्देशातील आंबेडकरी चळवळ खंड १,२,३ त्याचबरोबर आंबेडकरी योध्दा (गौरवग्रंथ), हंबरडा (कथासंग्रह), दाटुन आलेल्या कळा ( कवितासंग्रह), माणुसकीचा गहिवर (ललित लेखसंग्रह) असे सात ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. त्याचबरोबर त्यांनी विविध साहित्य संमेलनाच्या परिसंवादात, चर्चासत्रात,कवी संमेलनात सहभाग नोंदवला असुन त्यांचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय, विद्यापीठ स्तरीय अशा विविध पातळीवर शोधनिबंधही प्रकाशित झालेले आहेत.पुरस्कार मिळाल्याबद्दल प्राचार्य डॉ.एल.बी.पवार व मित्र परिवाराकडुन त्यांचे अभिनंदन होत आहे. कार्यक्रमाचे आयोजन प्रवीण नामदेव पवार यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ केले.कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन कवी गझलकार बाळासाहेब गिरी यांनी केले.

## प्रा. गुरप्पा शेटगार यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार



**धाराशिव (नागसेन कांबळे) :** येथील आर्यन फंक्शन हॉल सांजा रोड धाराशिव येथे गुंजोटी या गावामधील प्रा. गुरप्पा माणिकराव शेटगार यांना नुकताच आधुनिक लहुजी सेनेचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार आमदार राणा जगजितसिंग पाटील यांच्या हस्ते आणि आधुनिक लहुजी सेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक प्रदान करून गौरविण्यात आले.दरवर्षी आधुनिक लहुजी सेना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. आधुनिक लहुजी सेनेच्या संस्थापक अध्यक्षा नगीनाताई सोमनाथ म्हणाल्या की,समाजातील गुणसंपन्न व्यक्तींना प्रोत्साहन देऊन त्यांचा गुणगौरव करणे हे आधुनिक लहुजी सेनेचे कर्तव्यच आहे,सेनेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात.त्याविषयी सविस्तर माहिती दिली.उमरगा तालुक्यातील गुंजोटी या गावातील अतिशय सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेले आणि अतिशय प्रतिकूल परिस्थीतीमध्ये शिक्षण घेत डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून एम.ए. नाट्यशास्त्राची पदवी प्राप्त करून कला व सांस्कृतिक क्षेत्रात अतिशय उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांनी बीड येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बलभीम महाविद्यालय ,धाराशिव येथील विद्यापीठ उपकेंद्र याठिकाणी काही वर्ष सेवा केली आहे. गुंजोटीसारख्या ग्रामीण भागातील परंतु सांस्कृतिक वारसा असलेल्या गावातून त्यांना जन्मत:च अनेक ज्येष्ठ व सामाजिक कार्यकर्ते असलेल्या व्यक्तींचें मार्गदर्शन लाभले. त्यांचा वारसा पुढे चालवत, एक लेखक, एक दिग्दर्शक आणि एक कलाकार आणि विशेष म्हणजे एक व्यक्ती म्हणून ते सर्वांच्या मनात घर केले आहे.एक हजरजबाबी व्यक्तिमत्व म्हणूनही ते सर्वाना परिचित आहेत.

## जगन्नाथ गोशाळेचा गोमाता पुजन अनोखा उपक्रम



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथे श्री जगन्नाथ गोशाळेत उमरगा तालुक्यातील मौजे औराद येथील श्री.यादव विश्वंभर सूर्यवंशी यांनी आपली देशी गोवंश गोमाता श्री जगन्नाथ गोशाळेला देणगी म्हणून आणून दिली,या गोमातेचे मुरूम येथे आगमन होताच हलगी या गजरात श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते श्री जगन्नाथ गोशाळा पर्यंत ढोल ,हलगी च्या गजरात या गोमातेचे संपूर्ण मुरूम मधून मिरवणूक काढत गोमातेचे स्वागत,पूजन व औक्षण करण्यात आले सर्वप्रथम श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रोटरी क्लब मुरूम च्यावतीने गोमातेचे पूजन करण्यात आले,यावेळी रोटरीचे अध्यक्ष अप्पासाहेब सूर्यवंशी,मल्लिनाथ बडोले,डॉ नितीन डागा,डॉ.सुधीर पंचगल्ले, सुनील राठोड, संतोष कांबळे, वाकडे सर,कल्लाप्पा पाटील,भूषण पाताळे,आदी उपस्थितीत होते,तसेच यावेळी श्री जगन्नाथ गोशाळाला गोमाता देणगी म्हणून देणारे श्री यादव विश्वंभर सूर्यवंशी यांचेही स्वागत करण्यात आले,लुटे किराणा येथे गोमाता चे आगमन होताच लुटे किराणा च्यावतीने गोमातेचे पूजन करण्यात आले,महात्मा बसवेश्वर चौक येथे अंबर हार्डवेअरच्या वतीने मंथन अंबर यांनी गोमातेचे पूजन केले तसेच सिद्धाप्पा मठ येते साई किरण,मेडिकल व मुदकन्ना परिवाराच्या वतीने गोमातेचे पूजन औक्षण करण्यात आले.शेवटी श्री जगन्नाथ गोशाळा येथे सौ क्रांती सूर्यवंशी यांच्या हस्ते गोमातेचे पूजन करण्यात आले या वेळी श्री जगन्नाथ गोशाळा चे निर्मलकुमार लिमये, सूरज राजपूत ,रौनक शर्मा, प्रकाश सूर्यवंशी हजर होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ नोव्हेंबर २०२५


## लक्ष्मण वाल्डे यांच्या 'बाळ्या सायकल ॲम्बुलन्सवाला' या कादंबरीचे रविवारी पिशोर येथे प्रकाशन




**कन्नड** : कन्नड तालुक्यात अनेक ग्रामीण भागातील नव लेखक - कवी सातत्याने लेखन वाचन करीत आहे. साहित्य क्षेत्रात आपल्या सातत्यपूर्ण लेखणाने आपला नावलौकिक मिळवित आहेत. त्यापैकीच एक आघाडीचा युवा कवी - लेखक म्हणजे लक्ष्मण वाल्डे होय.पिशोरचे भूमिपुत्र असलेले लक्ष्मण वाल्डे यांनी नुकतीच कादंबरी लिहून प्रसिद्ध केली आहे. कादंबरी लेखन करणारा हा कन्नड तालुक्यातील पहिलाच युवा कादंबरीकार ठरला. ' बाळ्या सायकल ॲम्बुलन्सवाला ' हे कादंबरीचे शिर्षक असून शुन्यातून विश्व निर्माण करणाऱ्या एका ध्येयवादी युवकांची ही संघर्ष कथा आहे.प्रतिकुल परिस्थितीवर मात करून संघर्षातून जीवनाला आकार देणाऱ्या व आपला एक नवा आदर्श उभा करणाऱ्या एका जिद्दी युवकांची कहाणी या कादंबरीत येते. वास्तव चित्रण करणाऱ्या या कादंबरीचे कथानक कन्नड, पिशोर परिसराशी निगडित असून अनेक घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा, घाटमाथ्याची खास ग्रामीण बोली भाषा शैली, यांचे प्रतिबिंब या कादंबरीत उमटते. या कादंबरीचे प्रकाशन व चर्चा येत्या रविवारी पिशोर येथील ॲड. कृष्णा जाधव यांच्या चिकूच्या मळ्यात होत असून त्या कादंबरीवर चर्चा होणार आहे. नाना लहाने व प्रविण दाभाडे हे या कादंबरीवर भाष्य करतील. लेखक लक्ष्मण वाल्डे हे भूमिका मांडतील . इतर लेखक - वाचक चर्चेत सहभागी होतील. त्रैमासिक तिफण , तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड आयोजित तिफण साहित्य संवाद उपक्रमांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन केले. आहे. यावेळी गप्पा, गाणी, कवितावाचन, सामाजिक प्रश्नावर व साहित्यिक उपक्रम यावर विचारमंथन होईल. कन्नड तालुक्यातील लेखक - वाचक - पत्रकार यांचा स्नेहमेळावा ही होणार आहे. कन्नड तालुक्यातील पिशोर येथे येत्या रविवारी (ता. २) सकाळी ९.३० वा. संपन्न होणाऱ्या 'चला कवितेच्या गावा जाऊ ' या कार्यक्रमास पत्रकार, लेखक - वाचक यांनी उपस्थित राहावे असे आवाहन निमंत्रक ॲड. कृष्णा जाधव, संयोजक डॉ. शिवाजी हुसे, प्रविण दाभाडे आणि सर्व संयोजन समितीने केले आहे.

## तीन दशकानंतरही शिक्षण, शिक्षक अन् मैत्रीचे बंध कायम; गुंजोटीत तीस वर्षानंतर माजी विद्यार्थी एकत्र




**उमरगा (नागसेन कांबळे) :** कोणी नोकरदार तर कोणी उद्योजक, कोणी शेतकारी तर कोणी गृहिणी , अशा विविध क्षेत्रात, विविध ठिकाणी कार्यरत असलेले वर्गमित्र तब्बल तीन दशकानंतर एकत्र येत उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण विद्यालयातील १९९५ च्या दहावीतील माजी विद्यार्थ्यांचा वर्ग पुन्हा भरवला. दहावीत असताना ज्या बाकावर बसले होते त्याच बाकावर बसून आठवणीना उजाळा देत माजी विद्यार्थी स्नेह मेळावा नुकतेच उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक बसप्पा माळगे होते. प्रारंभी दिवंगत सर्व शिक्षक व वर्गमित्रांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत प्रत्येकांच्या नावे मेणबत्या पेटवून श्रद्धांजली वाहण्यात आली. या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेला दहा डबल साइड व्हाईट बोर्ड ज्ञानदान करिता भेट देण्यात आले, तसेच शाळेतील होतकरू, गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व घेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विभावरीताई शाईवाले, उपाध्यक्ष प्रभाकरराव हिरवे, संगय्या स्वामी, महाविद्यालय विकास समिती सदस्य कॉ. अरुण रेणके, सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवानंद बुदले, म्हाळप्पा दूधभाते, सुरेखा भोसले, मोहिब मुन्शी, सेवानिवृत्त शिक्षक सुनीता रेणके, खंडू म्हेत्रे, विलास शाईवाले , वाय. डी. जाधव, यादव जाधव, उर्मिला मार्डीकर, विष्णू जाधव, विश्वनाथ साखरे, लिपिक मोहन घाटे, मनोहर मिरजे , सिद्राम स्वामी , विठ्ठल साळुंखे, विद्यमान मुख्याध्यापक रविराज पाटील, मुख्याध्यापक दत्तात्रय गायकवाड, पर्यवेक्षक अविनाश पाटील, जीवन चव्हाण, उषा सगर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक माजी विद्यार्थी राहुल पाटील यांनी केले. साधना रंगदळ, सचिन इबत्ते यांनी शाळेतील किस्से सांगत हशा पिकविला. शिक्षकांचा तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा सत्कार करताना सर्वांनी त्यांच्या आयुष्यात दिलेल्या मोलाच्या संस्काराची आठवण करून दिली. त्याकाळात मिळालेले शिक्षण आणि मैत्रीचे बंधन आजही आपल्या आयुष्याच बळ आहे, असे मत विद्यार्थ्यांनी मांडले.यावेळी माजी विद्यार्थी एकमेकांचा परिचय, संगीत खुर्ची, गाण्याच्या भेंड्या आदी उपक्रम घेत उत्साहात मेळाव्याची सांगता झाली. महेश पाटील, राहुल पाटील, इब्राहिम इनामदार, सुनील देशमुख, इंद्रजीत म्हेत्रे, तनवीर काझी, विरपक्ष स्वामी, सुलक्षणा पाटील, राखी
कुलकर्णी, मधुमती मायाचारी, दत्ता पाचंगे, संजय कटकधोंड, संतोष खमितकर, विकास दूधभाते, संजय जगताप, सटवाजी पात्रे, रत्नकुमार बोळे, अशपाक पटेल, अनिल खजुरे, इंद्रजीत काळे, सदाशिव पाटील, आयुब मुजावर , मोती जेटिथोर, शिवाजी जाधव, दीपक बेळमकर गोविंद दूधभाते आदींनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला. इब्राहिम इनामदार व सुहासिनी चव्हाण यांनी सूत्रसंचलन केले. रुपमती मायाचारी यांनी आभार मानले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# काळया भुईचा, खामगावाचा भूमिपुत्र, पेरणीकाराचा तिफणच्या वतीने सन्मान



ज्ञानाच्या लेखणीचे शब्द शब्द सांगे अनुभवाचे मोल, जगण्याचे बोल. स्वभाव त्यांचा बडबडा ,तालुक्यात असं एकही गाव नाही. जिथे ज्ञानाची आणि ज्ञानाच्या कवितेची ओळख नाही. ज्ञानाच्या गोड स्वभावामुळे आणि त्यांच्या काळजाला भिडणाऱ्या काव्यामुळे, गावोगावी जीवाभावाची माणसं जोडल्या गेली. शब्दांनी पेरल त्यांनी साहित्याचं रान, ज्ञानाच्या साहित्याच अख्खा महाराष्ट्र गातो गुणगान...साधं भोळ राहणीमान, बडबडा , सदा हसरा, उदार मनाचा, जीवाला जीव लावणारा , सदैव काळजात राहणारा, इमानदार, कष्टाळू, परिस्थितीला न लाजणारा , पदरी पडलेल्या परिस्थितीशी स्वबळावर झुंज देणारा, सदा मातीशी नाळ जळून ठेवणारा, माणसातला माणूसपण जगणारा , जपणारा, दिलदार मनाचा दिलखुलास माणूस म्हणजे ज्ञानेश्वर गायके दादा...त्यांची लेखणी म्हणजे घामात, फुफाट्यात , कचऱ्यात, मातीत , जगण्यात या सगळ्यात गाडून उगलेली लेखणी आहे.हा संघर्षात पोळणारा कवी नेहमी हसत हसत जगतो. सखी मानून कागदाला मन मोकळ करतो. हलका करुन भार जीवनाचा, कुटुंबासाची जिम्मेदारी निभवता निभवता स्वत:साठी जगतो. खडकाळ रानात, पोळलेल्या, जळून राख झालेल्या रानात हा कवी आपल्या सुख दु:खांची शब्द पेरणी करुन नव्या उमेदीने उगवून आणतो. आणि तीच उगवलेली , हिरवीगार बहरलेली पेरणी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ याच शब्द पेरणीला राजमान्य करुन कवी ज्ञानेश्वर गायके यांना राजमान्य कवी म्हणून या साहित्य क्षेत्रात शिक्कामोर्तब करतात.आयुष्याला मर्यादा आहे पण स्वप्नांना मर्यादा नाही. आपल्या कामाला मर्यादा नाही.आपल्या हावडेला मर्यादा नाही. माणसाने जेवढं केलं तेवढं त्याला कमीच पडत असत सदा..! त्याच्या मनाचं समाधान होत नाही. लालची चक्रात माणूस गुरफटून जातो. स्वत:साठी जगता जगता जगण्याचं राहून जात. त्यामुळे कविवर्य ज्ञानेश्वर गायके सर हे प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन आयुष्याचा प्रत्येक क्षणोक्षण आनंदाने जगतात. मला जर त्यांच्या कवितेविषयी थोडक्यात सांगायचे ठरले तर मी खालील प्रमाणे म्हणेल...आबा तुमच्या जिभेला सरस्वतीचा स्पर्श चमत्कारी शब्द तुमचे होत्या हो मंत्र ज्ञानोबा नावाचा वारसा तुम्हाला साहित्याचा गंध तुमच्या मनाला मुखामधी साखर शब्दामधी जादू तुमच्या काव्यातून बोले ज्ञानोबा तुकोबा जणू साहित्याच्या वारसदाराला ज्ञानेश्वर गायके मामाला कुणाचा ज्ञाना कुणाचा माऊली त्यांच्या खारीच्या वावराला घाटमाथ्याचं हृदय देतो थेट काळया भुईला...महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदानातून प्रकाशित झालेला त्यांचा पेरणी या काव्यसंग्रहाला त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा,कन्नडया संस्थेचा तिफण राज्यकाव्य पुरस्कार जाहीर झाला.दर वर्षी तिफणच्या वतीने, होणारा तिफण राज्यस्तरीय काव्यसंमेलनात नव कवीना त्यांच्या दर्जेदार साहित्यासाठी तिफण राज्यकाव्य पुरस्कार दिला जातो. सन २०२६ येणाऱ्या राज्यस्तरीय तिफण काव्य महोत्सवात, तिफणच्या वतीने या वर्षीचे पुरस्काराचे मानकरी कविवर्य ज्ञानेश्वर गायके दादा हे आहे.कविवर्य ज्ञानेश्वर गायके सरांच साहित्य येणाऱ्या साहित्यिक काळात रामबाण साहित्य ठरणार यांची शाश्वती आजचा काळ देतो. पेरणीकाराची लेखणी सामान्य, अती सामान्य माणसाला सहज कळते. काळजाला भिडते. एवढ्या सोप्या शब्दात सुख दु:ख मांडणारा हा कवी आहे. त्यांची लेखणी रापलेल्या साहित्यिकांना जरी नवखे वाटत असले तरी त्यांचे साहित्य वाचता येणाऱ्या,अक्षर ओळख असणाऱ्या वाचकाला सहज उमजेल असा साहित्यिक आणि जन मनात रापलेले त्यांचं साहित्य आहे. साहित्य कठीण असलेल्यापेक्षा सहज कुणालाही समजेल असे साहित्य असले तर त्या साहित्यिकांवर त्यांच्या साहित्यावर प्रेम करणारी माणसं आपोआप जुडून येतात याच चालत बोलत जिवंत उदाहरण म्हणजे कवी ज्ञानेश गायके सर...पारखं झालं गाव,माझ्या गावाची वाट, पाचुंदा इत्यादी कवितासंग्रह व आठवणी ललित लेख संग्रह इत्यादी पेरणीकार यांचे साहित्य प्रकाशनाच्या वाटेवर आहे.'पारखं झालं गाव' हा कविता संग्रह बालखेडा येथे होणाऱ्या ४व्या तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सवास प्रकाशन होणार आहे. हा साहित्य प्रवास एकट्या कविवर्य ज्ञानेश्वर गायके सरांचा नसून आमचे आदरणीय मार्गदर्शक तिफणकार डॉ.शिवाजी हुसे सरांच्या मार्गदर्शनाखाली समस्त तिफण परिवार कन्नड साहित्यिकांचा प्रवास यशस्वीरित्या मार्गस्थ आहे. कविवर्य ज्ञानेश्वर गायके सरांची लेखणी ही अशीच फुलत जावो. येणाऱ्या पिढींच्या जगण्याला बळ देवो. आणि येणाऱ्या काळात जगाच्या साहित्याला त्यांच्या लेखणीची दखल घेण्यास भाग पाडो ही समस्त तिफण परिवार कन्नड साहित्यिकांच्या वतीने सदिच्छा... आमच्या पेरणीकार ज्ञान गायके दादांना पुढील साहित्यिक वाटचालीस खारीच वावरभर, भरभरून शुभेच्छा...


**लक्ष्मण वाल्डे -कन्नड**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं:-8888606068**



प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ नोव्हेंबर २०२५


## देशाची अखंडता टिकवण्यासाठी लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच कार्य प्रेरणा देणारे आहे - पोलिस उपअधीक्षक सदाशिव शेलार




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारताच्या स्वातंत्र्यानंतर संस्थानांचे एकत्रीकरण करण्यात मोलाची भूमिका बजावणारे, भारतीय संघाची एकता टिकवून ठेवणारे भारताचे पाहिले गृहमंत्री आणि उपपंतप्रधान "भारताचे एकीकरणकर्ता" असे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त पोलिस ठाणे उमरगा, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय करिअर कट्टा, एन सी सी, पोलिस पाटील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने एकता दौड रॅलीचे आयोजन करण्यात आले.देशाची अखंडता टिकवण्यासाठी एकता दौड मधून संदेश देताना सरदार वल्लभाई पटेल यांचे कार्य सर्वांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देणारी आहे असे आवाहन पोलिस उपअधीक्षक सदाशिव शेलार यांनी केले.श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय येथून या एकता दौडचा शुभारंभ पोलिस उपअधीक्षक सदाशिव शेलार , पोलिस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी, प्राचार्य डॉ संजय अस्वले, यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी सहायक पोलिस निरीक्षक श्रीकांत भराटे, पोलिस उपनिरीक्षक रामहरी चाटे, गंगाधर पुजरवाड, पाडुरंग कन्हेरे, डॉ उदय मोरे, प्रशांत पाटील, बंडू पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी, प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी मनोगत आणि शुभेच्छा दिल्या.या एकता दौडचा समारोप हुतात्मा स्मारक येथे करण्यात आला. या उपक्रमासाठी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील प्राध्यापक, पोलीस ठाणे उमरगा येथील सर्व पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील संघटनेचे प्रतिनिधी, दिशा अकॅडमी, करिअर कट्टा आणि एनसीसी चे विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# 'चला जाऊया... कवितेच्या गावा'

**कन्नड** तालुका हा नैसर्गिक, ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचा व वैशिष्टयपूर्ण असा तालुका आहे. कन्नड तालुक्याचे भौगोलिकदृष्ट्या काळी भूई, घाटमाथा आणि नागदपट्टी असे भूभाग पडतात. काळीभूई परिसर म्हणजे पिशोर परिसर. पिशोर हे मोठे व्यापार, शिक्षण, उद्योग, व्यवसाय आणि सुमारे ५० पेक्षा अधिक खेडे जोडून असलेले कन्नड तालुक्यातील महत्वाचे गाव आहे. सुपीक व कसदार जमिन, डोंगराळ भाग, अंजनासागर, पुर्णा नेवपूर प्रकल्प, याबरोबरच धार्मिक दृष्टिने हिराजी महाराजाचे पुरातन मंदिर, जुन्या गावात सिध्देश्वरांचे अतिशय प्राचीन व दुर्मिळ मंदिर, याच परिसरात वाकी येथे नारायणदेव बाबा यांनी स्थापित केलेले शिवेश्वर संस्थान, लोकनेते बाळासाहेब पवार यांच्यासह अनेकांचे श्रद्धास्थान. नेवपूर वाकी शिवारात असलेले शनैश्वर संस्थान, सुखदेव महाराज यांचा नावलौकिक असलेले. करंजखेड ही पावन भूमी क्रांतिविर काकासाहेब देशमुख यांची कर्मभूमी असलेले. वनदेव मंदिर याच परिसरात आहेत. मेहेगाव - वासडी परिसरात असलेले भगवानगड वारकरी चळवळीचे केंद्र ठरले आहे. देवपूळ येथे नवसाला पावणारा नवशा गणपती असे कितीतरी महत्वाची स्थळे याच परिसरात प्रसिद्ध आहेत. राजकीय दृष्टया मा. आ. रायभानजी जाधव, सुदामराव जाधव, तेजस्विनीताई जाधव, हर्षवर्धन जाधव, संजनाताई जाधव, पुंडलिकराव घुगे, अप्पाराव घुगे, किसनकाका कोल्हे, संतोष कोल्हे, स्वातीताई कोल्हे, गणेश घुगे, केतन भैय्या काजे, अवचित वळवळे, मोकासे दादा, अशी किती तरी राजकीय मंडळी या भागात होऊन गेली. त्यांनी पिशोर परिसराचे नावलौकिक वाढविला. सांस्कृतिक दृष्टयाही हा परिसर वैभव संपन्न आहे. पिशोरला नाटय चळवळ, टाकळी अंतूर येथे नाटय परंपरा, करंजखेड, मेहेगाव आदी भागात कलगीतुऱ्याची भजनी मंडळी, पूर्वी देवपूळ येथील भारूडकार प्रसिद्ध होते. जागरण गोंधळ करणारे कलावंतही या भागात आहेत. चांगले भजनी मंडळे आहेत. शेती क्षेत्रातही नवनविन प्रयोग करणारे शेतकरी या परिसरात आहेत. हस्ता हे शैक्षणिक क्षेत्रात आघाडीवर अरुणारे आदर्श गाव. या परिसरात अनेक स्वातंत्र्य सैनिक होऊन गेले. लोकनेते बाळासाहेब पवार यांना मानणारा ही मोठा वर्ग या परिसरात आहे. साहित्य व शैक्षणिक क्षेत्रात मान्यवर मंडळी या भागात आहेत. समता विद्यालय, महात्मा फुले विद्यालय, अंजनासागर विद्यालय, या शिक्षण संस्था महत्वाच्या भूमिका बजावत आहेत. समता विद्यालयात सावित्रीबाई जयंती निमित्त होणारा समता महोत्सव सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाचा आहे. अनेक विद्यार्थी यातून घडले. अनेक नामवंत वक्ते या महोत्सवास येऊन गेले. वासडी येथे जिल्हा वक्तृत्व स्पर्धा बन्शिधर निकम, किसनराव घुगे यांच्या पुढाकारातून होतात. पिशोर , वासडी परिसरात अनेक गुन्हाळे आहेत. या भागातील गुळ व अद्रक प्रसिद्ध आहे. मका, हळद, स्ट्रॉ बेरी, ड्रगन फ्रुट शेती करणारे शेतकरी ही या भागात आहे. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अँड. कृष्णा पा. जाधव, सागर जाधव , कविताताई वाघ यांचे नाव अंग्रेसर आहेत. पंचक्रोशित शैक्षणिक संस्थांचे जाळे आहे. पिशोर या गावाला वैभव प्राप्त करून देण्याचे काम आजपर्यंत अनेकांनी केले. साहित्य क्षेत्रातही पिशोर परिसर अग्रेसर आहे. वाकीचे बाबा यांच्यावर ही गौरव ग्रंथ निघाले आहेत. रायभान जाधव, तेजस्विनी जाधव, नवले गुरुजी, प्रा. नवनाथ काळे,यांच्यावर गौरवग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांनी आपले लेखनही केलेले आहे. नव्या पिढीत डॉ. संजय गायकवाड, अशोकसिंग शेवगण, नाना लहाने, विवेकानंद सुकाळे, प्रभत शेळके, लक्ष्मण वाल्डे, समाधान निकम, रायभान जाधव, दत्ता मोरस्कर, भिमराव सोनवणे, वृषाली सोनवणे , डॉ. अनिता खंडागळे, डॉ. वंदना पाटील, अमोल मोकासे, चित्रकार प्राणजीत बोरसे, वर्षा बोरसे, आदी मंडळी साहित्य लेखन करीत आहेत. त्यांची पुस्तकेही प्रसिद्ध आहेत. ही सर्व मंडळी साहित्य व सामाजिक क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान देत आहेत. अनेक पत्रकार या भागात प्रसिद्ध आहेत. त्यांनी या भागाचे प्रश्न वर्तमान पत्रातून मांडले, पिशोर येथे दोन वर्षापूर्वी तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सव, पी. एम. डहाके, व अॅड. कृष्णा पा. जाधव यांच्या पुढाकारातून संपन्न झाला. मेहेगाव च्या भगवानगडावर तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सव मागील वर्षी संपन्न झाला. या वर्षी बालखेडा येथे हा कविता महोत्सव अशोकसिंग शेवगण यांच्या पुढाकाराने संपन्न होत आहे. ते उत्तम कवी, रसिक आणि साहित्य प्रेमी आहेत. डॉ. संजय गायकवाड यांनी चरित्रात्मक व अन्य लेखन करून आपला ठसा उमटविला आहे. मेहेगाव च्या भगवान गडाचे अध्यक्ष सुधीर घुगे यांनी अनुवाद विषयक पुस्तक व कादंबरी लिहून योगदान दिले आहे. नव्या पिढीत लक्ष्मण वाल्डे, समाधान निकम, भिमराव सोनवणे, हे उत्तम काव्यलेखन करीत आहेत, आपल्या लेखनातून या परिसराचे चित्रण करीत आहेत. लक्ष्मण वाल्डे यांनी शासनाच्या अनुदानातून कविता संग्रह प्रसिद्ध केला. समाधान निकम यांचाही संग्रह शासनाच्या अनुदानातून प्रसिद्ध झाला आहे. वाल्डे यांनी कादंबरी लिहिली आहे. प्रभत शेळके यांनीही उत्तम काव्य लेखन केले आहे. अनेकांची पस्तके यापुढेही येतील. आता येत्या २ नोहेंबर रोजी तालुक्यातील मान्यवर लेखक, कवी, वाचक आणि पत्रकार यांचा स्नेह मेळवा पिशोर या गावी अँड कृष्णा पा. जाधव यांच्या प्रयत्नातून होत आहे. लक्ष्मण वाल्डे यांच्या कादंबरीचे प्रकाशन होणार आहे. साहित्य व वाचन चळवळीला बळ देणारा हा उपक्रम तिफण साहित्य संवाद अंतर्गत होत आहे. विविध सामाजिक प्रश्नावर विचारमंथन होणार आहे. या मेळाव्याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. कन्नड तालुक्यात साहित्य चळवळ चांगलीच जोम धरीत आहे. सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयाचे विविध उपक्रम, तिफणचे विविध उपक्रम, शिवाजी महाविद्यालयाचा मराठी विभाग यांच्या पुढाकाराने अनेक उपक्रम होत आहे. या साहित्य चळवळीला उद्योजक मा. मानसिंहजी पवार साहेब, प्राचार्य डॉ. विजय भोसले, पी. एम. डहाके, अॅड. कृष्णा पा. जाधव, उत्तमराव राठोड, डॉ. सिताराम जाधव, सागर जाधव, यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळत आहे. तसेच डॉ. रमेश सूर्यवंशी, डॉ. अंबादास सगट, डॉ. प्रतिभा अहिरे,प्रा. रंगनाथ लहाने, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. प्रकाश खेत्री, डॉ. रुपेश मोरे आदींचे मार्गदर्शन व प्रेरणा मिळत आहेत. कन्नड तालुक्यात पिशोर परिसरातील साहित्यिकाइतके साहित्यिक, कवी, अन्य भागात नाही. पिशोर परिसर हा साहित्य व सांस्कृतिक चळवळीचे केंद्र झाले आहे. यापुढेही अनेक लेखक , कवी , रसिक, वाचक या भागात तयार होतील, असा मला विश्वास आहे . येत्या रविवारी साहित्यिक, पत्रकार, वाचक यांची मांदियाळी पिशोरच्या शिवारात दाखल होत आहे. या उपक्रमातून साहित्य चळवळीला बळ मिळून नवलेखक , वाचक यांना प्रेरणा मिळेल. पिशोर आता साहित्यिकाचे गाव, कवितेचे , वाचकांचे, पत्रकारांचे गाव म्हणून पुढे येत आहे. ही सांस्कृतिक ओळख पिशोरला नावलौकिक प्राप्त करून देणारी ठरेल. कन्नड तालुका पत्रकार संघ, पिशोर परिसर पत्रकार बांधव यांचे मार्गदर्शन व पाठबळ या चळवळीला मिळत आहे. सर्व घटक एकत्र आल्यास पिशोरच नाही तर कन्नड तालुका हा ' कवितेचे गाव ' म्हणून नावारूपास आल्याशिवाय राहणार नाही. याच कार्यक्रमात गप्पा, गाणी, कविता वाचन आणि पिशोरचा भूमिपुत्र युवा लेखक लक्ष्मण वाल्डे यांच्या बाळ्या सायकल अम्बुलन्स वाला या कादंबरीचे प्रकाशन होणार आहे. चला तर मग येत्या रविवारी पिशोरच्या स्नेहमेळाव्यास अर्थात 'चला जाऊया.. कवितेच्या गावा '. या कार्यक्रमास आपण अवश्य यावे. आपल्या कवितेच्या गावात, आपल्या कवितेच्या रसिक , वाचकांच्या गोतावळ्यात. मी येतोय आपण ही यावे. या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हावे ! या मेळव्याच्या व पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमासाठी सर्व संयोजन समिती मा.अॅड. कृष्णा पा. जाधव यांच्या मार्गदर्शना खाली विशेष परिश्रम घेत आहेत. हेच निमंत्रण समजून कार्यक्रमास उपस्थित राहावे,त्यासाठीच हे आग्रहाचे निमंत्रण !' चला जाऊया... कवितेच्या गावा. 'प्रा. डॉ. शिवाजी हुसे, तिफण वाचक चळवळ

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ नोव्हेंबर २०२५



ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड., एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com


# आमच चुकलय काय...! कधी संपणार कळंकी ग्रामस्थांचा वनवास



**कन्नड (अरुण थोरात) :** संभाजीनगर, नाशिक, जळगाव जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात वसलेल, चोहीं बाजूने घनदाट जंगलांनी वेढलेल कळंकी ता. कन्नड गाव सरकार, प्रशासन, राज्यकर्ते, लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे अठराव्या शतकातील जीवन जगत आहे. रस्ते, पाणी, आरोग्य, मोबाईल नेटवर्क आदी मुलभूत सुविधांपासून कोसो दूर आहे. अर्ज, विनंत्या, निवेदने, बहिष्कार, अशी सर्व संविधानिक मार्ग अवलंबून ही गावाची साडेसाती संपण्याचे नाव घेईना, निसर्ग संपन्न परिसर, उत्तरेस गौताळा अभयारण्याचा भाग, पूर्व पश्चिम दक्षिणेस प्रा.वनविभागाचे जंगल, शिवनानदीचे उगमस्थान, परिसरात ऐतिहासिक पेडकागड, गावात प्रसिद्ध दक्षिणमुखी वीर हनुमान देवस्थान, गावसीमे लगत अशिया खंडातील सर्वात प्रचीन पितळखोरे लेणी, पाटणादेवी देवस्थान, कन्हेरगड, जैनलेणी, हेमाडपंथी मंदीर, पौराणिक मद्रासीबाबा आश्रम, केदारकुंड तीनकुंड धबधबे,असा भौगोलिक वारसा, यादव साम्राज्याच्या पाऊलखुणा इतके सारे असून ही गाव तसे चांगले, परंतू सरकारी अनास्थेने भंगले अशी अवस्था झालीय. गावात बहुसंख्य मराठा समाज असून त्याखालोखाल आदिवासी समाजाची मोठी संख्या आहे. येथील अर्थकारण शेती, शेतमजूरी, पशुपालन, ऊसतोडणी वरती अवलंबून आहे. गावातून एकमात्र प्रजिमा-25 जातोय, परंतू या रस्त्याने पायी चालणे ही अशक्य झालय. या रस्त्याचे काम अर्धवट रखडले आहे. तर चिवळीघाट खड्ड्यात गेलाय, ग्रामस्थांना बैंक, वैद्यकीय दवाखाना लगत च्या वडनेर गावात आहे. परंतू तेथे जाण्यासाठी असणारा रस्ता ही नरक यातना भोगतोय. गावासाठी कोटी रुपयांच्या घरातील जलजिवन मिशन पाणी पुरवठा योजना मंजूर आहे. मात्र ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे उन्हाळ्यात ग्रामस्थांना वणवण भटकावे लागतेय, प्रशासन ही या ठेकेदारावर मेहरबान आहे. देशाची 'डिजिटल इंडिया' कडे वाटचाल सुरु आहे. येथे मात्र मोबाईल नेटवर्क विस्कळीत आहे. सरकारी थाटातील बिएसएनएल कंपनीने येथे मोबाईल टावर उभारले खरं, पण असून अडचण नसून खोळंबा खिशाला ताप, अशी अवस्था झालीय. आता सर्व सरकारी योजना आनलाईन झाल्यात, त्यात आनलाईन रेशन पावती, पिकपेरा, ओटीपी, केवायसी चा रट्टा, वेबसाइट, एप चे नखरे, या सरकारी तालावर नाचता नाचता ग्रामस्थांना हातात मोबाईल घेऊन, डोंगर माथा भटकत फिरावे लागत आहे. त्यात जेष्ट नागरीक, महिलांचे हाल बेहाल होत आहे. या असुविधांचा परिणाम येथील जीवनमाना वरती झालाय. हिरवीगार बागायती शेती असून ही बाहेरगावची मंडळी या गावात सोयरीक करायला टाळताहेत, भौतिक सुविधा अभावी सरकारी कर्मचारी ही तालुका, जिल्ह्याच्या गावी राहून 'ग्रामसेवा' करीत आहे.गावात प्राथमिक व माध्यमिक शाळा आहेत, पण प्राथमिक शाळेत शिक्षकांची वाणवा आहे. रिक्त जागा भरण्या ऐवजी महसूल प्रशासनाचा येथील शिक्षका वरतीच 'मेहरबानी' डोळा आहे. त्यामुळे येथील एक शिक्षक तहसील मध्ये निवडणूक विभागात पडून असतो. तर मुख्याध्यापकाचे पदच सरकारने उडविले आहे. त्यामुळे शिक्षणाचे ही अलबेल आहे. आरोग्य सेवेचे ही तीनतेरा आहेत. गावास वडनेर येथील प्रा.आरोग्य केंद्राशी जोडले आहे. थंडी तापाच्या गोळया आणि बाललसीकरण येवढाच काय तो याचा उपयोग, रात्री अपरात्री सर्पदंश, विषबाधा, गर्भवती महिला, गंभीर रुग्णांला येथून वीस किमी. अंतरावरील कन्नड येथे दगड गोटे पार करीत न्यावे लागलते. यात आतापर्यंत उपचारा अभावी कित्येकांचा मृत्यू झालाय. गाव परिसरातील वनराई चा वरदहस्त लाभलाय, पण हीच वनराई येथील विकास कामांत अडथळा ठरत आहे. रस्त्यांच्या कामांसाठी प्रत्येक वेळी वनविभागाची परवानगी घ्यावी लागते. त्यामुळे कंत्राटदार मंडळी विकास कामं घेण्यास धजावत नाही. रानडुक्कर, हरीण, वानर, रोही आदी वन्यजीवांच्या उपद्रवामुळै येथील शेती धोक्यात आलीय. त्यातच बिबट्यांच्या भीती खाली पशुपालक त्रस्त आहेत. ही सर्व गाऱ्हाणी सरकारी यंत्रणा पर्यंत पोहचविल्या गेलीय. मात्र कोणात्याही यंत्रणेला दयामाया येत नाही. 'नेहमीच येतो पावसाळा' म्हणी प्रमाणे निवडणूका आल्या की नेते पक्ष , अधिकारी, गावात येतात. पोटभर आश्वासने देऊन मतांची पेटी भरुन जातात. परंतू गावाचे हाल संपतायेत ना वनवास, आपल्या मागण्यासाठी निवडणूकां वरती बहिष्कार टाकून बघीतले. अधिकारी येतात चॉकलेट देऊन जातात. परंतू परिस्थिती जैसे थे....!त्यामुळे नेमकं आमच चुकलय काय...! कधी संपणार हा वनवास असे म्हणण्याची वेळ येथील ग्रामस्थां वरती आलीय.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ नोव्हेंबर २०२५


# राष्ट्रीय लेखक दिन : समाजाचे आरसे आणि परिवर्तनाचे शिल्पकार

लेखन हे केवळ शब्दांची मांडणी नव्हे, तर समाजाच्या विचारसंस्कृतीचे, भावविश्वाचे आणि काळाच्या स्पंदनाचे दस्तऐवजीकरण असते. म्हणूनच लेखक हा समाजाचा सजग साक्षीदार, चिंतक आणि परिवर्तनाचा वाहक असतो. दरवर्षी १ नोव्हेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय लेखक दिन (National Authors Day) हा दिवस या शब्दशिल्पींच्या कर्तृत्वाला, चिंतनाला आणि समाजातील योगदानाला सलाम करणारा दिवस आहे. साहित्य, समाजशास्त्र आणि सांस्कृतिक परंपरेच्या संगमातून लेखक समाजाला आरसा दाखवतो, प्रश्न विचारतो आणि कधी कधी त्या समाजाला बदलाच्या दिशेने नेतो. या दिवसाचे महत्त्व फक्त लेखकाच्या गौरवापुरते मर्यादित नाही; ते सामाजिक जाणीवेचा, वैचारिक संवादाचा आणि सांस्कृतिक बांधिलकीचा उत्सव आहे.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, लेखकाचे कार्य हे समाजरचनेच्या विविध घटकांशी निगडित असते. एमिल दुर्खाईमसारख्या समाजशास्त्रज्ञाने 'सामाजिक वास्तव' (Social Facts) या संकल्पनेद्वारे सांगितले की, समाजातील मूल्ये, विचार आणि नैतिकता ही व्यक्तीच्या पलीकडील एक सामूहिक शक्ती आहे. लेखक हीच सामूहिकता आपल्या शब्दांतून प्रतिबिंबित करतो. तो समाजातील वास्तव अनुभवतो, त्याचे अर्थ लावतो आणि त्यावर भाष्य करून समाजाच्या आत्मस्मृतीचा भाग बनतो. म्हणूनच प्रत्येक युगाचा लेखक त्या काळाच्या सामाजिक इतिहासाचा जिवंत साक्षी असतो. त्याची लेखणी काळाला दिशा देते आणि समाजाला अंतर्मुख करते.भारतीय समाजाच्या संदर्भात पाहता, लेखन हे केवळ अभिव्यक्तीचे साधन नव्हते, तर सामाजिक संवाद आणि परिवर्तनाचे शक्तिशाली माध्यम राहिले आहे. संतकाव्याची परंपरा असो किंवा सुधारक चळवळीतील लेखन, भारतातील लेखकाने नेहमी सामाजिक जबाबदारी स्वीकारली आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत कबीर यांनी शब्दांच्या माध्यमातून समतेचा आणि मानवतेचा संदेश दिला. पुढे राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, प्रबोधनकार ठाकरे, प्रेमचंद, शरतचंद्र, आचार्य अत्रे, अण्णाभाऊ साठे यांसारख्या लेखकांनी आपल्या काळातील विषमता, जातिभेद, शोषण आणि अन्याय याविरुद्ध लेखणी उचलली. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे तर, हे लेखक 'सामाजिक बदलाचे शिल्पकार' होते, जे समाजातील मूल्यव्यवस्थेला आव्हान देऊन नवी जाणीव निर्माण करीत होते.लेखन ही समाजातील सांस्कृतिक भांडवलाची निर्मिती असते. पिएर बोर्द्यू यांनी 'Cultural Capital' (सांस्कृतिक भांडवल) या संकल्पनेतून सांगितले की, ज्ञान, भाषा, अभिरुची, आणि प्रतीकात्मक मूल्ये ही समाजातील सत्ता-संबंध ठरवतात. लेखक हाच या सांस्कृतिक भांडवलाचा निर्माता असतो. त्याच्या लेखनातून नवे शब्द, नवी अर्थसृष्टी आणि नवे विचार उदयाला येतात. जेव्हा लेखक समाजातील वंचित, शोषित, अल्पसंख्याक वा उपेक्षित घटकांचा आवाज बनतो, तेव्हा तो समाजातील सत्ता-संबंधांमध्ये असंतुलन दाखवतो आणि न्याय्य रचनेसाठी संघर्ष करतो. म्हणून लेखक हा केवळ सर्जक नसतो, तर सामाजिक न्यायाचा वाहक असतो.आधुनिक काळातही लेखनाचे स्वरूप बदलले असले तरी त्याची सामाजिक जबाबदारी कायम आहे. डिजिटल माध्यम, सोशल मीडिया, ब्लॉग, ई-पत्रिका यामुळे अभिव्यक्तीची क्षेत्रे विस्तारली आहेत, पण लेखकाचे काम तितकेच कठीण झाले आहे. कारण माहितीचा ओघ, दिशाभूल आणि भावनिक ध्रुवीकरण या नव्या आव्हानांनी लेखकाच्या स्वातंत्र्यावर नवे प्रश्न निर्माण केले आहेत. समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट मार्क्युसे यांनी 'Repressive Tolerance' (दमनकारी सहिष्णुता) या संकल्पनेद्वारे सांगितले होते की, आधुनिक समाजात स्वातंत्र्य दिले जाते पण त्याच स्वातंत्र्यातून नियंत्रणही ठेवले जाते. आजच्या काळातील लेखक या नियंत्रणाविरुद्ध, मतस्वातंत्र्याच्या आणि विवेकाच्या बाजूने उभा राहणे आवश्यक आहे. कारण लेखकाचे मौन हे सत्तेचे बळ बनते, तर त्याचा उच्चार समाजाच्या विवेकाचे द्योतक ठरतो.भारतीय समाजात लेखक हा केवळ साहित्यिक नसून तो समाजकारणी, शिक्षक, विचारवंत आणि चळवळीकर्मीही राहिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन हे केवळ कायदेपंडिताचे नव्हे, तर समाजशास्त्रीय चिंतनाचे प्रतिक आहे. त्यांच्या लिखाणाने वंचित समाजाला आत्मसन्मान दिला आणि सामाजिक परिवर्तनाचा मार्ग दाखवला. त्याचप्रमाणे अण्णाभाऊ साठे यांनी लोककलेच्या माध्यमातून सामाजिक वास्तव मांडले; त्यांचे लेखन समाजशास्त्रातील 'लोकसंस्कृतीचे समाजशास्त्र' या संकल्पनेला अधोरेखित करते. अशा लेखकांचे लेखन म्हणजे लोकसंस्कृतीचा आवाज आहे, जो शास्त्रीय आणि लोकजीवनाच्या मधोमध उभा आहे.लेखक समाजाला केवळ विचार देत नाही, तर विचार करण्याची पद्धत घडवतो. त्याच्या लेखनामुळे वाचकांमध्ये सामाजिक भान निर्माण होते. समाजशास्त्रज्ञ अँथनी गिडन्स यांनी 'Reflexivity' म्हणजेच आत्मपरीक्षणात्मक समाज ही संकल्पना मांडली. लेखक हे आत्मपरीक्षण शक्य करतो. तो समाजाला स्वतःकडे पाहण्याची दृष्टी देतो. म्हणूनच लेखन हे समाजाच्या आरशासारखे असते; परंतु हा आरसा फक्त वास्तव दाखवत नाही, तर समाज कसा असावा याचाही विचार करायला लावतो. लेखकाची लेखणी समाजाच्या अंतःकरणात उतरते, प्रश्न विचारते आणि कधी कधी विद्रोह घडवते.आजच्या काळात जेव्हा माहितीचा स्फोट झाला आहे, तेव्हा लेखकाची जबाबदारी अधिक वाढली आहे. तो सत्य आणि असत्य, विचार आणि अफवा, भावना आणि प्रचार यांच्यामधील सीमारेषा स्पष्ट करतो. समाजशास्त्रीयदृष्ट्या, लेखक समाजातील 'सांस्कृतिक मध्यस्थ' (Cultural Mediator) असतो, जो परंपरा आणि आधुनिकता, भावना आणि विवेक, स्थानिकता आणि जागतिकता यांचा संवाद घडवतो. जागतिकीकरणाच्या युगात स्थानिक भाषांतील लेखक समाजाच्या ओळखीचे रक्षण करत आहेत. मराठी, हिंदी, बंगाली, तमिळ, पाली अशा भारतीय भाषांतील लेखक समाजाच्या मुळांशी जोडलेले आहेत आणि ते 'स्थानिकतेचे समाजशास्त्र' घडवतात.लेखकाचे व्यक्तिमत्व हे समाजातील वर्ग, लिंग, जात, धर्म, संस्कृती आणि राजकारणाशी घट्ट गुंफलेले असते. समाजशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स यांनी सांगितले की, साहित्य समाजाच्या आर्थिक अधिष्ठानाशी निगडित असते. लेखक त्या अधिष्ठानाचे प्रतिबिंब दाखवतो किंवा त्याविरुद्ध आवाज उठवतो. स्त्री लेखक, दलित लेखक, आदिवासी लेखक, अल्पसंख्याक लेखक यांनी त्यांच्या लेखनातून जो नवा दृष्टिकोन मांडला आहे, तो समाजशास्त्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांच्या लेखनाने 'प्रभुत्वशाली कथनां'ना आव्हान दिले आणि समाजातील असमानता उघड केली. त्यामुळे लेखक केवळ सौंदर्याचा रचनाकार नाही, तर सामाजिक सत्याचा विश्लेषकही आहे.राष्ट्रीय लेखक दिन हा केवळ उत्सव नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. या दिवशी आपण लेखकांना सन्मान देतो, पण त्याचबरोबर समाज म्हणून आपले वाचन, विचार आणि विवेक तपासतो. वाचकांशिवाय लेखक अपूर्ण आहे, आणि लेखकांशिवाय समाज मुक आहे. म्हणून हा दिवस लेखक-वाचक नात्याच्या संवेदनशीलतेचा दिवस आहे. प्रत्येक लेख, धडा, पुस्तक हे समाजाच्या संवादाचा भाग आहे, प्रत्येक शब्द हा परिवर्तनाचे बीज आहे.आजच्या काळात जेव्हा अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येत आहेत, तेव्हा लेखकाने अधिक धैर्याने बोलणे आवश्यक आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या, लेखकाचे मौन हे 'सांस्कृतिक अधिपत्या'च्या (Cultural Hegemony) बळकटीस कारणीभूत ठरते, तर त्याचा उच्चार लोकशाहीच्या प्राणवायूसारखा असतो. म्हणूनच लेखकाचा सन्मान म्हणजे विचारस्वातंत्र्याचा सन्मान आहे.एकूणच पाहता, राष्ट्रीय लेखक दिन हा केवळ साहित्याचा नव्हे, तर समाजाच्या आत्म्याचा उत्सव आहे. तो समाजाला स्मरण करून देतो की, लेखणी ही शस्त्र आहे, जी रक्त सांडत नाही, पण समाज जागवते. लेखक हा समाजाच्या विवेकाचा दीपस्तंभ आहे, जो काळोखातही प्रकाश देतो. समाजशास्त्रीय अर्थाने लेखक म्हणजे समाजाच्या चेतनेचा संरक्षक आहे. त्याचे लेखन म्हणजे समाजाच्या स्मृतींचे जतन आणि भविष्याचा आराखडा होय. त्यामुळे या दिवसाचे खरे औचित्य असे की, आपण प्रत्येकजण थोडासा 'लेखक' व्हावा, विचार करणारा, प्रश्न विचारणारा, आणि बदलाची बीजे पेरणारा. शब्दांमध्ये समाज जगतो, आणि लेखक त्याला अर्थ देतो.राष्ट्रीय लेखक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा




**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**
मो. - 9960103582
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com








# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ नोव्हेंबर २०२५


# कर्तव्यदक्ष ठाणेदार यांच्या बदनामीचे षडयंत्र - व्यापारी पिता पुत्र प्रशासनाची दिशाभूल करून प्रशासनास वेठीस धरण्याच्या प्रयत्नात!








**बुलढाणा प्रतिनिधी - महेश मुंढे** : किनगाव राजा ता.सिंदखेड राजा जि. बुलढाणा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार मा. संजय मातोंडकर हे गुन्हेगारीवर कठोर कारवाई व निष्पक्ष तपासासाठी ओळखले जातात. मात्र अलीकडच्या काळात काही स्वार्थी मंडळींनी म्हणजे अवैध धंदे करणाऱ्यांनी स्वतःच्या गैर कृत्यावर पडदा टाकण्यासाठी मातोंडकर यांच्या प्रतिमेला धक्का देण्याचा कपट पूर्ण प्रयत्न सुरू केल्याची गोपनीय माहिती समोर येत आहे, किनगाव राजा परिसरात कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्यासाठी दिवस रात्र परिश्रम घेणारे मा. संजय मातोंडकर ठाणेदार पोलीस ठाणे किनगाव राजा हे नाव आज जनतेत प्रामाणिकपणा आणि निर्भीड कार्यशैली चे प्रतीक बनले आहे, मात्र जेव्हा सत्य आणि न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा काही स्वार्थी लोकांना तो असह्य ठरतो, सध्या असाच प्रकार व्यापारी पिता पुत्राच्या रूपाने समोर आला आहे शेतकऱ्यांच्या श्रमाचे शोषण करून संपत्ती गोळा करणाऱ्या या मंडळींनी स्वतः वरील कारवाई टाळण्यासाठी प्रशासनाची दिशाभूल, खोटे आरोप यांचा आश्रय घेतल्याचे वृत्त आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की गेल्या काही दिवसापासून समाज माध्यमावर एक तरुण विष प्राशन करून जीवन संपवत असल्याची व्हिडिओ क्लिप समोर आली आहे त्याच्या म्हणण्यानुसार किनगाव राजा पोलीस ठाण्याचे ठाणेदार मा. संजय मातोंडकर यांच्या व काही लोकांच्या जाचाला कंटाळून विष प्राशन करून जीवन संपवत असल्याचे समजले परंतु या प्रकरणाची संपूर्ण पडताळणी केली असता वेगळीच माहिती समोर आली पवन प्रल्हाद जायभाये व त्याचे वडील प्रल्हाद आश्रुबा जायभाये हे दोघेही 2022 पासून शेतमाल खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात परिसरातील शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार शेतमालाचे व्यापारी म्हणून त्यांची कारकीर्द खूप काही चांगली नाही, 2022 पासून 2025 पर्यंत त्यांनी सिंदखेड राजा तालुक्यातील 70 ते 80 शेतकऱ्यांचे पैसे दिलेले नाहीत अंदाजे एकूण रक्कम 80 ते 90 लाख एवढी आहे किंवा त्यापेक्षा जास्तही असू शकते.दिनांक 27- 10 - 2025 रोजी पवन प्रल्हाद जायभाय वय वर्ष 32 याने रामेश्वर सांगळे रा.जऊळका यांनी त्याची बैल जोडी चोरून नेल्याचे आरोप करत तक्रार देण्यास आला होता , चौकशी केली असता गैर अर्जदार रामेश्वर सांगळे यांनी पोलीस ठाणे किनगाव राजा येथे हजर होऊन स्पष्ट केले की प्रल्हाद अश्रुबा जायभाये यांनी खरेदी केलेल्या शेतमाला च्या पैशाच्या बदल्यात ही बैल जोडी तात्पुरत्या स्वरूपात वापरण्यास दिली होती इतर शेतकऱ्यांनीही पवन प्रल्हाद जायभाये व प्रल्हाद अश्रुबा जायभाये यांनी त्यांचा शेतमाल खरेदी केला मात्र अजूनही पैसे दिले नसल्याचे तक्रार अर्ज पोलिसांना दिले आहेत, या पार्श्वभूमीवर पोलिसांनी पवन प्रल्हाद जायभाये आणि प्रल्हाद आश्रुबा जायभाये यांना समज पत्र देऊन " आपण चौकशीसाठी उपस्थित रहावे व उपस्थित न राहिल्यास सर्व शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून तुमच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला जाईल". अशी सूचना केली होती ही सूचना मिळाल्यानंतर पवन प्रल्हाद जायभाये याने आपल्या राहत्या घरी व्हिडिओ क्लिप तयार केली ज्यात त्याने ठाणेदार आणि संबंधित लोकांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करत आहे असे म्हटले आणि विषारी औषध प्राशन केले व सदरील व्हिडिओ क्लिप समाज माध्यमावर प्रसारित केली, गावात माहिती मिळताच नागरिकांनी व नातेवाईकांनी त्याला तात्काळ प्राथमिक आरोग्य केंद्र बीबी येथे दाखल केले तिथे डॉक्टरांनी उपचारादरम्यान पवन याने मद्यप्राशन करून विषारी औषध प्राशन केल्याचे सांगितले व त्याला जालना येथील सामान्य रुग्णालयात स्थलांतरित केले पोलिसांनी त्याचा जबाब घेण्याचा प्रयत्न केला असता त्याने जबाब देण्यास नकार दिला दिनांक 29 ऑक्टोबर रोजी त्याचे प्रकृती स्थिर असल्याने डॉक्टरांनी त्याला डिस्चार्ज दिला असून सध्या त्याची प्रकृती स्थिर आहे. पवन प्रल्हाद जायभाये याने जे विषारी औषध प्राशन केले ते एक प्रकारचे टॉनिक असल्याचे दिसत आहे. सदरील प्रकरणात पवन प्रल्हाद जायभाये याने पोलीस प्रशासनावर दबाव आणून गुन्हा दाखल होऊ नये म्हणून आत्महत्येचा बनाव केल्याचे आणि ठाणेदार संजय मातोंडकर पोलीस ठाणे किनगाव राजा यांची प्रतिमा मलिन करण्याचा बनाव केल्याचे स्पष्ट झाल्याने त्याच्या विरुद्ध अदखलपात्र अपराध क्र. 445/2025, भारतीय नवीन फौजदारी संहिता ( BNS ) कलम 226 अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पवन प्रल्हाद जायभाये व प्रल्हाद आश्रुबा जायभाये यांचे विरुद्ध फसवणूक झालेल्या 25 ते 30 शेतकऱ्यांनी देखील तक्रारी दिलेल्या आहेत व गुन्हा दाखल झाल्याची माहिती मिळताच अजूनही बरेच शेतकरी पवन विरुद्ध तक्रार देण्यास समोर येत आहेत, त्यासंबंधी सखोल चौकशी सुरू असल्याचे ठाणेदार संजय मातोंडकर यांनी सांगितले आहे व सदर तरुणाने आत्महत्येचा प्रयत्न करून प्रशासनावर व शेतकऱ्यांवर दबाव आणण्याचा व लुबाडलेला शेतकऱ्यांचा कष्टाचा पैसा लाटण्याचा नाट्यपूर्ण प्रकार होता असे चौकशीतून स्पष्ट झाले आहे. सदर युवक हा अरेरावीची भाषा करून शेतकऱ्यांना गेल्या तीन ते चार वर्षापासून फसवत आहे तरी शेतकऱ्यांची मागणी आहे की आम्हाला न्याय मिळेल का? आमच्या कष्टाचे पैसे आम्हाला मिळतील का? गेल्या 3 ते 4 वर्षापासून शेतकरी पोलीस ठाणे किनगाव राजा येथे सदर तरुणाविरुद्ध तक्रारी करत आहेत परंतु त्याच्या या वागण्यामुळे आतापर्यंत कुठलीही कारवाई झाली नाही , ठाणेदार मा. संजय मातोंडकर पोलीस ठाणे किनगाव राजा यांनी या युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचे पैसे मिळतील अशी आशा निर्माण झाली आहे. ठाणेदार मा. संजय मातोंडकर यांनी गुन्हेगारांविरोधात शून्य सहिष्णुता धोरण राबवले आहे त्यामुळे अनेक अवैद्य व्यवसाय करणाऱ्यांचे धंदे बंद झाले आहे त्यामुळे हाच मुद्दा काही स्वार्थी व्यक्तींना खुपला असून त्यांनी पोलीस प्रशासनावर व ठाणेदार यांच्या प्रतिमेवर चिखल फेक सुरू केली आहे. प्रामाणिक अधिकारी यांना बदनाम करून समाजात गोंधळ निर्माण करणे हा केवळ अन्याय नव्हे तर कायद्याचा आणि लोकशाहीचा अपमान आहे. अशा अफवांना बळी न पडता सत्य आणि न्यायाच्या बाजूने उभे राहणे ही आज प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. फसव्या स्वार्थी मंडळींच्या या डावपेचांचा परदाफाश होऊन त्यांच्याविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई व्हावी हीच जनतेची अपेक्षा आहे. सजग नागरिकांनीही या डावपेचांचे स्वरूप ओळखून शेतकऱ्यांचे शोषण करणारे व्यापारी आणि कायद्याचा गैर व्यापार करणारे लोक हे कधीच समाज हिताचे असू शकत नाहीत त्यांच्या अफवांपासून सावध राहून सत्याच्या बाजूने उभे राहणे गरजेचे आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ नोव्हेंबर २०२५

# भारतातील महिलांविरुद्ध वाढते अत्याचार व गुन्हेगारी : सामाजिक वास्तव आणि परिवर्तनाची गरज

**भा**रतीय समाजातील स्त्री ही आदिम संस्कृतीपासूनच पूजनीय मानली गेली आहे. भारतीय परंपरा अशी सांगते की ज्या ठिकाणी स्त्रीचा सन्मान केला जातो, तेथे अधिक सामाजिक प्रगती होत असते. पण आजच्या वास्तवात हे वचन फक्त ग्रंथांपुरतेच मर्यादित राहिले आहे. कारण भारतासारख्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वैविध्यपूर्ण देशात महिलांविरुद्ध वाढणारे अत्याचार हे मानवी मूल्यांना काळिमा फासणारे आणि समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारे वास्तव बनले आहे. शिक्षण, उद्योग, राजकारण, प्रशासन आणि विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महिलांनी उल्लेखनीय प्रगती केली असली तरी त्यांच्या विरुद्ध घडणारे गुन्हे सतत वाढत आहेत, हे चिंतेचे आणि आत्मपरीक्षणास प्रवृत्त करणारे आहे. भारताच्या राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या (NCRB) २०२३ च्या आकडेवारीनुसार देशात दररोज सुमारे ८५-९० पेक्षा अधिक बलात्काराच्या घटना, १०० पेक्षा अधिक आपहारणाच्या घटना आणि ३० पेक्षा अधिक कौटुंबिक हिंसचारची प्रकरणे नोंदवली जातात. या आकडेवारीत सर्वाधिक गुन्हे राजस्थान, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि प. बंगाल या राज्यांमध्ये नोंदले गेले आहेत. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि मानसिक स्तरावर महिलांविरुद्धची हिंसा भारतीय समाजाच्या असमान सत्तासंबंधांचे प्रतिबिंब दर्शवते. स्त्रीविरोधी गुन्हे हे केवळ कायद्याचा किंवा पोलिसांचा विषय नाहीत, तर ते सामाजिक मानसिकतेचे द्योतक आहेत. १९९० नंतर उदारीकरण, माध्यमांचा विस्तार आणि शिक्षणवाढ झाली, तरी महिलांबद्दलची मानसिकता फारशी बदललेली नाही. समाजात स्त्रीला आजही "स्वामित्वाच्या वस्तू"सारखे स्थान दिले जाते. विवाहसंस्थेपासून कार्यक्षेत्रापर्यंत तिला समानतेचा अधिकार कायद्यात दिला असला, तरी वर्तनात आणि मूल्यांमध्ये पितृसत्ताक विचार अजूनही घट्ट रुजलेला आहे. महिला अत्याचारांमध्ये छेडछाड, लैंगिक शोषण, हुंडाबळी, बालविवाह, कौटुंबिक हिंसाचार, सामाजिक बहिष्कार, कार्यक्षेत्रातील लैंगिक छळ आणि सायबर गुन्हे या सर्वांचा समावेश होतो. ग्रामीण भागात अशा गुन्ह्यांचे प्रमाण अनेकदा दडपले जाते, कारण स्त्रियांना न्याय मिळवण्यासाठी सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अडथळ्यांना सामोरे जावे लागते. परिणामी, नोंदवलेल्या गुन्ह्यांपेक्षा प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनांची संख्या कितीतरी पटीने जास्त असल्याचे तज्ज्ञ मानतात.राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या (NCRB) 2023 च्या आकडेवारीनुसार, भारतात महिलांविरुद्ध गुन्ह्यांची एकूण नोंदवलेली प्रकरणे ४.५ लाखांहून अधिक होती. यामध्ये सर्वाधिक म्हणजे ३१ टक्के प्रकरणे कौटुंबिक हिंसाचाराशी, २० टक्के लैंगिक छळ आणि बलात्काराशी, तर १७ टक्के छेडछाडीशी संबंधित होती. ग्रामीण भागात महिलांवरील अत्याचार अधिक वाढलेले असून, त्यामागे सामाजिक भीती, अशिक्षा, आर्थिक अवलंबित्व आणि कायद्याविषयी अज्ञान हे प्रमुख घटक आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर, महिलांविरुद्धची हिंसा ही "सत्तासंबंधांतील असमानतेची अभिव्यक्ती" आहे. समाजशास्त्रज्ञ सिल्विया वॉल्बी यांनी 'पितृसत्ताक रचना' (Patriarchal Structure) या संकल्पनेत स्पष्ट केले आहे की, पुरुषसत्ताक व्यवस्था महिलांना अधीनस्थ ठेवण्यासाठी आर्थिक, वैवाहिक, धार्मिक आणि सांस्कृतिक साधनांचा वापर करते. त्यामुळे स्त्रियांवरील हिंसा ही केवळ वैयक्तिक विकृती नसून एक संस्थात्मक हिंसा आहे. कुटुंब, माध्यमे, धर्म, परंपरा, शिक्षण आणि कायदा या सर्व सामाजिक संस्था कधी ना कधी या हिंसेला अप्रत्यक्ष मान्यता देतात. महिलांविरुद्ध होणाऱ्या अत्याचारांची मुळे भारतीय समाजाच्या पितृसत्ताक रचनेत खोलवर रुजलेली आहेत. पितृसत्ता म्हणजे पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्था जी स्त्रीला दुय्यम, अवलंबून आणि अधीन ठेवते. समाजशास्त्रज्ञ सिमोन द बोव्हा यांनी म्हटल्याप्रमाणे, "स्त्री जन्मतः स्त्री नसते तर तिला समाज स्त्री बनवतो." भारतीय संदर्भात हे विधान अत्यंत सुसंगत आहे, कारण लहान वयापासूनच मुलींवर लादले जाणारे नैतिक, धार्मिक आणि कौटुंबिक बंधन त्यांच्या आत्मविश्वासाचा आणि स्वातंत्र्याचा गळा घोटतात. परिणामी स्त्रियांना सामाजिक संरचनेत असमान स्थान मिळते आणि अत्याचारास पोषक वातावरण तयार होते. महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांवर प्रभाव टाकणारे काही समाजशास्त्रीय घटकही उल्लेखनीय आहेत. त्यामध्ये पितृसत्ताक सामाजिक संरचना, आर्थिक अवलंबित्व, शिक्षणाचा अभाव, सामाजिक कलंक आणि भीती माध्यमांतील स्त्रीप्रतिमा इत्यादी.महिलांविरुद्ध होणाऱ्या अत्याचारांच्या स्वरूपाकडे पाहिले तर ते फक्त शारीरिक नसतात; ते मानसिक, आर्थिक, भावनिक आणि संरचनात्मक पातळीवरही पसरलेले असतात. बालपणी मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणे, विवाहासाठी जबरदस्ती करणे, हुंड्याच्या नावाखाली छळ करणे, किंवा विधवेला सामाजिक बहिष्काराच्या जाळ्यात अडकवणे ही सर्व उदाहरणे अप्रत्यक्ष हिंसेची आहेत. या प्रकारच्या हिंसेला समाज मान्यता देतो कारण ती परंपरा, धर्म आणि सवयींच्या नावाखाली योग्य ठरवली जाते. हेच स्त्रीविरोधी संस्कृतीचे मूळ आहे. शहरांमध्ये आधुनिकतेचा आणि शिक्षणाचा प्रभाव वाढला असला तरी महिलांविरुद्धचे गुन्हे अद्यापही भयानक प्रमाणात घडतात. कामाच्या ठिकाणी वरिष्ठांकडून लैंगिक छळ, सार्वजनिक ठिकाणी छेडछाड, सायबर स्टॉकिंग, मॉर्फिंग किंवा ऑनलाइन ब्लॅकमेलिंग ही नवीन रूपे आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सायबर गुन्ह्यांनी महिलांच्या वैयक्तिक जीवनात हस्तक्षेप करणे वाढले आहे. इंटरनेटवरील 'डिजिटल गॅप' मुळे महिलांचे सायबर-सुरक्षा ज्ञान मर्यादित राहते आणि त्या या नव्या प्रकारच्या हिंसेच्या बळी ठरतात. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या (NCRB) अहवालानुसार २०२३ मध्ये एकूण सायबर गुन्ह्यापैकी सुमारे २५ टक्के गुन्हे महिलांविरुद्ध होते. डिजिटल माध्यमात महिलांच्या सुरक्षेची संकल्पना अजून पूर्णपणे विकसित झालेली नाही, ज्यामुळे तंत्रज्ञानाच्या गैरवापरातून मानसिक व सामाजिक हिंसेचे नवे रूप उदयास आले आहे. ग्रामीण भारतात परिस्थिती आणखी गंभीर आहे. ग्रामीण भागातील स्त्रिया आर्थिकदृष्ट्या अवलंबून, शिक्षणात मागास, आणि न्यायव्यवस्थेपर्यंत पोहोचण्यास असमर्थ असतात. त्यांच्याविरुद्ध घडणारे अत्याचार, जसे की बालविवाह, कौटुंबिक छळ, दारिद्र्यामुळे वेश्याव्यवसायात ओढले जाणे, आदिवासी महिलांवरील लैंगिक अत्याचार, इ. हे सामाजिक विषमतेचे द्योतक आहेत. समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास यांनी 'सांस्कृतिक अंतर' (Cultural Lag) ही संकल्पना मांडली होती, ज्याअन्वये सामाजिक मूल्ये आणि आधुनिक कायदे यांच्यातील विसंगती समाजातील अन्याय वाढवते. भारतात कायद्यांनी महिलांना समान हक्क दिले असले तरी संस्कृतीत अजूनही त्या 'दुसऱ्या श्रेणीच्या नागरिक' म्हणून पाहिल्या जातात.कायद्यांच्या पातळीवर पाहिले तर भारतात महिलांच्या सन्मान आणि सुरक्षेसाठी अनेक कायदे अस्तित्वात आहेत. जसे की हुंडा प्रतिबंध अधिनियम १९६१, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध अधिनियम २००५ , लैंगिक छळ प्रतिबंध अधिनियम २०१३, बाललैंगिक अत्याचार प्रतिबंध अधिनियम २०१२ (POCSO), आणि आयपीसी कलम ३७६ अंतर्गत बलात्कारावरील कठोर शिक्षा. मात्र, या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठीची प्रक्रिया अजूनही क्लिष्ट आहे. समाजातील पुरुषप्रधान मानसिकता, पोलिस यंत्रणेतील उदासीनता, न्यायालयीन प्रक्रियेतील विलंब, आणि पीडितेवर होणारा सामाजिक दबाव हे घटक तिच्या न्यायप्राप्तीच्या मार्गातील मोठे अडथळे ठरतात. महिलांवरील अत्याचार हे केवळ वैयक्तिक समस्या नाहीत; ते संपूर्ण समाजाच्या नैतिकतेचा आणि मानसिकतेचा परावर्तक आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर हे गुन्हे सामाजिक संरचनेतील असमानता, सत्तासंबंध, आणि सांस्कृतिक मूल्यव्यवस्थेच्या असमतोलामुळे उद्भवतात. कार्यात्मक दृष्टिकोन (Functional Perspective) सांगतो की समाजातील प्रत्येक सामाजिक संस्था कुटुंब, धर्म, शिक्षण, अर्थव्यवस्था या परस्परांवर अवलंबून आहेत. जेव्हा या संस्थांमध्ये असंतुलन येते, तेव्हा सामाजिक विकृती निर्माण होते. महिलांविरुद्ध वाढणारे अत्याचार हे या विकृतीचेच द्योतक आहेत.स्त्री शिक्षण हा या समस्येवरील सर्वात प्रभावी उपाय आहे. शिक्षित स्त्री ही केवळ आपल्या हक्कांची जाणीव ठेवते असे नाही, तर ती समाजातील लिंगसमानतेच्या संकल्पनेलाही बळ देते. परंतु भारतातील वेगवेगळ्या सर्वेक्षणांच्या आधारे असे दिसते की ग्रामीण भारतात अजूनही सुमारे 30 टक्के महिलांना प्राथमिक शिक्षणाच्या पलीकडे जाण्याची संधी मिळत नाही. शिक्षण, रोजगार आणि राजकीय सहभाग यांचा अभाव स्त्रियांना असुरक्षिततेच्या कचाट्यात ठेवतो. 'शिक्षित स्त्री म्हणजे जागृत समाज' ही संकल्पना वास्तवात उतरवणे ही काळाची गरज आहे. माध्यमांची भूमिका येथे अत्यंत महत्त्वाची आहे. आज माध्यमे महिलांवरील अत्याचारांना प्रकाशझोतात आणतात, पण त्याचबरोबर अनेकदा 'सेन्सेशनलिझम'मुळे पीडितेची प्रतिमा नकारात्मक पद्धतीने मांडली जाते. समाजशास्त्रज्ञ गिडेन्स यांच्या 'स्ट्रक्चरेशन थिअरी'प्रमाणे माध्यमे समाजाच्या विचारप्रणालीचे संरचनात्मक प्रतिबिंब आहेत. त्यामुळे माध्यमांनी आपली जबाबदारी ओळखून स्त्रीविषयक बातम्यांमध्ये संवेदनशीलता आणि वस्तुनिष्ठता ठेवणे आवश्यक आहे. राज्य आणि समाज दोघांची जबाबदारी आहे की महिलांसाठी सुरक्षित, सन्माननीय आणि न्याय्य वातावरण तयार करावे. शासकीय यंत्रणांनी महिलांसाठी कार्यरत हेल्पलाइन, आश्रयगृहे, समुपदेशन केंद्रे, आणि फास्ट ट्रॅक न्यायालये प्रभावीपणे चालवावीत. परंतु केवळ सरकारी उपाय पुरेसे नाहीत; प्रत्येक नागरिकाने आपल्या कुटुंबात, शाळेत आणि कार्यक्षेत्रात लिंगसमानतेची जाणीव विकसित करणे आवश्यक आहे.भारताचा संविधानिक दृष्टिकोन स्त्री-पुरुष समानतेचा आहे. अनुच्छेद १४, १५ आणि १६ अंतर्गत समान हक्कांची हमी दिली आहे, तर अनुच्छेद ३९ (अ) मध्ये महिलांना समान वेतनाचा अधिकार दिला आहे. परंतु हे हक्क फक्त कागदावर

मर्यादित राहिल्यास त्याचे काहीच औचित्य नाही. समाजातील मानसिक परिवर्तनाशिवाय स्त्रीसुरक्षा अशक्य आहे. समाजशास्त्रज्ञ एमिल दुरखीम म्हणतात की, "समाजातील मूल्ये आणि नैतिकता जेव्हा दुर्बल होतात, तेव्हा 'अनॉमी' म्हणजेच सामाजिक अराजकता निर्माण होते." आज भारतीय समाजातील स्त्रीविषयक हिंसा ही या अराजकतेचेच द्योतक आहे. स्त्रीविषयक गुन्हे थांबविण्यासाठी दीर्घकालीन सामाजिक परिवर्तन आवश्यक आहे. बालपणापासूनच मुलांना आणि मुलींना समानतेचे मूल्य शिकवले पाहिजे. शाळांमधील लिंगसंवेदनशील शिक्षण, कार्यस्थळी लैंगिक छळावरील प्रशिक्षण, आणि समाजातील सर्व स्तरांवर स्त्री सन्मानाच्या चळवळी या परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करू शकतात. स्त्रीवादाचा मूळ हेतू 'स्त्री विरुद्ध पुरुष' असा नसून 'समान मानवतेचा' आहे, हे समाजाने समजून घेणे अत्यावश्यक आहे. महिलांविरुद्ध वाढणारे अत्याचार हे राष्ट्राच्या विकासाच्या पायाभरणीला खिळ घालतात. स्त्री ही कुटुंब, समाज आणि राष्ट्रघटनाची केंद्रबिंदू आहे. तिच्या सन्मानाशिवाय कोणताही समाज प्रगत होऊ शकत नाही. आजची आवश्यकता म्हणजे कठोर कायदे नव्हे, तर संवेदनशील समाज निर्माण करणे. स्त्रीसुरक्षा ही केवळ कायद्याची जबाबदारी नाही, ती प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे.शेवटी, भारतीय समाजाला पुन्हा एकदा आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. 'स्त्री ही शक्ती आहे, दुर्बल नाही' हे वास्तव आचरणात आणणे आवश्यक आहे. लिंगसमानतेची जाणीव, शिक्षणाद्वारे सक्षम होणारी स्त्री, न्यायप्रणालीवरील विश्वास, आणि समाजातील मानवी मूल्यांची पुनर्स्थापना हेच महिलांविरुद्ध वाढणाऱ्या अत्याचारांविरुद्धचे सर्वात प्रभावी अस्त्र ठरतील.



**. राजेंद्र बगाटे, (समाजशास्त्राचे अभ्यासक)**

**मो. - 9960103582 ईमेल - bagate.rajendra5@gmail.com**